# नागपूर जिल्हा
# वीज तांत्रिक कामगार सहकारी पत संस्था
# मर्यादित नागपूर

( नोंदणी क्रमांक: एन.जी.पी./ ओ./ १०५ १९८८-८९ )



# ३६ वा वार्षिक अहवाल

## ( २०२३-२४ )

**" तांत्रिक भवन "**, प्लॉट नंबर-४ अ, ईश्वर देशमुख कॉलेज गेट समोर, क्रीडा चौक नागपूर-४४ ००२४
फोन नं : 7875648800

# नागपूर जिल्हा
# वीज तांत्रिक कामगार सहकारी
## पत संस्था मर्या.नागपूर

नोंदणी क्र.:एन.जी.पी./ओ./105/1988-89

## विद्यमान संचालक मंडळ

मार्गदर्शक



मा. श्री. रवि बारई
केंद्रीय अध्यक्ष
विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन

सल्लागार



मा.श्री. किशोर फाले
माजी विश्वस्त
कामगार कल्याण मंडळ



श्री.प्रशांत ननोरे
अध्यक्ष



श्री.किशोर ढाले
उपाध्यक्ष



श्री.पांडूरंग कुकडे
सचिव



श्री.अरविंद डिवरे
कोषाध्यक्ष



श्री. दिलीप बावणकुळे
संचालक



श्री.अजय मोरे
संचालक



श्री.पुरुषोत्तम आमधरे
संचालक



श्री.अनिल ढोले
संचालक



श्री.गणपती सुरजागडे
संचालक



श्री.अभंग पंचभाई
संचालक



श्री.आशिष कडू
संचालक



सौ. अस्मिता ईसळ
संचालिका



श्रीमती राजेश्री लेंडे
संचालिका

नागपूर जिल्हा

# वीज तांत्रिक कामगार सहकारी

## पत संस्था मर्या.नागपूर

नोंदणी क्र.:एन.जी.पी./ओ./105/1988-89

## संस्थेची ठळक वैशिष्ठ्ये

- ऑडिट वर्ग सुरुवातीपासून 'अ'
- सभासदांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय समोर ठेवून योग्य असा कारभार करणे.
- सभासदांना स्वभांडवलातून माफक दरात कर्ज वाटप.
- मय्यत सभासदांच्या वारसास कल्याण निधी अंतर्गत रु. २०,००१/- (वीस हजार एक रुपये) ची तात्काळ मदत.
- सामुहिक विमा योजना अंतर्गत मृतकाचे वारसास रु. २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार रुपये) ची मदत.
- सभासदांच्या गुणवत्ता प्राप्त पाल्यांचा सत्कार करणे.
- सेवानिवृत्त सभासदांचा सपत्नीक सत्कार करणे.
- सभासदांकडून योग्य दरात मुदती ठेव व आवर्त ठेवी स्विकारणे.
- आजच्या स्थितीत संस्थेची एकुण कर्ज मर्यादा
  २०,००,०००/- (विस लाख रुपये) यांत
  वस्तूरुप कर्ज २,००,०००/- (दोन लाख रुपये) व
  आकस्मिक कर्ज मर्यादा रु. ८०,००० (पगारानुसार)
- कर्जावरील व्याजाचा दर ९.५०%
- मुदती ठेवीवरील व्याजाचा दर ७.५०% व ८.००%.

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा **'महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह'** रेशिमबाग चौक, नागपूर येथे दिनांक ७/७/२०२४ रोज रविवार सकाळी १०.०० वा. खालील नमुद केलेल्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी संचालक मंडळाने आमंत्रित केली आहे. तरी सन्माननिय भाग धारकांची उपस्थिती प्रार्थनिय आहे.

## -: विषय सुची :-

१) दि.९/०७/२०२३ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२३-२४ अखेरच्या काटोल शाखेच्या ताळेबंद पत्रक, नफातोटा पत्रक यास मंजुरी प्रदान करणे.

३) संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२३-२४ अखेरच्या एकत्रित ताळेबंद पत्रक,नफातोटा पत्रक यास मंजुरी प्रदान करणे.

४) संचालक मंडळाने मंजूर केल्यानुसार सन २०२३-२४ या वर्षात झालेल्या निव्वळ नफ्याचे विनियोजन पत्रकास व लाभांश वाटपास मंजुरी प्रदान करणे.

५) सन २०२४-२५ वर्षाकरिताचे अंदाज पत्रकास मंजुरी प्रदान करणे.

६) संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी प्रदान करणे.

७) ऑडीट अहवाल सन २०२३-२४ चे वाचन करुन ऑडीट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.

८) सन २०२४-२५ साला करिता अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणुक करणे.

९) सन २०२४-२५ साला करीता वैद्यानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे.

१०) सन २०२४-२५ वर्षाकरिता अधिकोषाकडून कर्ज घेण्याची मर्यादा ठरविणे.

११) सभासदांकडून आलेल्या लेखी सुचना व प्रश्नाबाबत खुलासा करणे.

१२) मा.अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

१३) आभार प्रदर्शन.

## -: विशेष सुचना :-

१) गणपुर्तीच्या अभावी सभा तहकुब झाल्यास सदर्हु सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर मुळसभेच्या विषयपत्रिकेनुसार कामकाज पार पाडण्यासाठी सभा सुरु होईल व त्या सभेला गणपुर्तीची आवश्यकता भासणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न किंवा माहिती विचारायची असेल त्यांनी आपले प्रश्न लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळात संस्थेच्या लिपिका जवळ दि.२ /७/२०२४ पुर्वी द्यावेत. नंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. तसेच अनावश्यक व वेळेवर येणाऱ्या प्रश्नास उत्तर देणे संचालक मंडळाला बंधनकारक राहणार नाही.

३) मा.अध्यक्षांच्या परवानगीनंतरच विचार व्यक्त करण्याची संधी दिली जाईल.

४) सभेला येतांना अहवाल पुस्तिका सोबत आणावी. सभेला उपस्थित सभासदानांच भत्ता मिळेल.

५) लाभांश वितरण दि. ७.७.२०२४ ला आमसभेच्या मंजुरी नंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी वितरीत करण्यात करण्यात येईल.

नागपूर
दि.२२/०६/२०२४

संचालक मंडळाचे आदेशान्वये
**श्री.पांडुरंग कुकडे**
सचिव

## संचालक मंडळ

**श्री.प्रशांत ननोरे**
अध्यक्ष

**श्री किशोर ढाले**
उपाध्यक्ष

**श्री.पांडुरंग कुकडे**
सचिव

**श्री.अरविंद डिवरे**
कोषाध्यक्ष

**श्री.दिलीप बावनकुळे**
संचालक

**श्री.अजय मोरे**
संचालक

**श्री.पुरुषोत्तम आमधरे**
संचालक

**श्री.अनिल ढोले**
संचालक

**श्री.गणपती सुरजागडे**
संचालक

**श्री.अभंग पंचभाई**
संचालक

**श्री.आशिष कडू**
संचालक

**सौ.अस्मिता ईसळ**
संचालिका

**श्रीमती राजेश्री लेंडे**
संचालिका

**श्री.किशोर फाले**
तज्ञ संचालक

**श्री.अतुल पोफळी**
व्यवस्थापक तथा कार्यलक्षी संचालक

## कर्मचारी वर्ग

**श्री.शेखर गाढवे**
वरिष्ठ लिपीक

**सौ.वर्षा द्रव्यकार**
कनिष्ठ लिपीक

**श्री.धवल देशमुख**
कनिष्ठ लिपीक

**श्री.विनोद भोंगाडे**
दप्तरी

**श्री.विनोद मालापुरे**
शिपाई

सभासदांचे समाधान हेच संस्थेचे ध्येय.

सन १९८८-८९ ते २०२३-२४ पर्यंतचा

# प्रगतीचा आढावा

| वर्ष अखेर | सभासद संख्या | भाग भांडवल | ठेवी | कर्ज वाटप | निव्वळ नफा | लाभांश | ऑडीट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८८-८९ | ४३९ | ०.९४ | ००.०० | ०००.९५ | ००.०१ | ००% | ब |
| ८९-९० | ४४४ | ०२.८८ | ०२.०७ | ००६.५२ | ००.३४ | ०४% | ब |
| ९०-९१ | ४८९ | ०५.६२ | ०६.५९ | ०१५.८८ | ००.९४ | ०७% | ब |
| ९१-९२ | ५२७ | ०८.६७ | १०.६३ | ०२०.९८ | ०१.७८ | ०९% | अ |
| ९२-९३ | ५६० | १०.३६ | १५.३१ | ०२२.४२ | ०१.२५ | ०९% | अ |
| ९३-९४ | ६०१ | १४.१२ | २३.४४ | ०३३.४५ | ०३.०१ | १२% | अ |
| ९४-९५ | ८१८ | १९.२५ | ३३.१० | ०५४.१९ | ०४.६२ | १२% | अ |
| ९५-९६ | ८७१ | २३.८३ | ४६.१८ | ०९०.८२ | ०५.१४ | १२% | अ |
| ९६-९७ | ९७० | ३९.३२ | ६३.३४ | ११८.२१ | ०९.०१ | १५% | अ |
| ९७-९८ | ९७४ | ५५.७४ | ९९.४५ | १४०.२३ | १०.४४ | १५% | अ |
| ९८-९९ | १०३२ | ७९.६५ | १२४.७३ | १७४.४४ | १३.१६ | १५% | अ |
| ९९-२००० | १२४२ | १०३.२३ | १६१.१० | २७३.०२ | १५.११ | १५% | अ |
| २०००-०१ | १२३९ | १२७.०० | १८३.७६ | ३३१.०६ | २२.०९ | १५% | अ |
| २००१-०२ | १२७० | १४८.९० | २३६.२६ | ३७२.७४ | २६.७८ | १५% | अ |
| २००२-०३ | १२७७ | १६९.६७ | २३६.७९ | ४५९.८५ | ३०.७२ | १५% | अ |
| २००३-०४ | १२५० | १८९.३४ | ३२५.६१ | ५१७.२५ | ३३.१४ | १४% | अ |
| २००४-०५ | १२७९ | २१०.०१ | ३४७.४१ | ५७०.२२ | ३४.११ | १२% | अ |
| २००५-०६ | १२४१ | २३६.७४ | ३५२.०७ | ६४९.५४ | २९.२१ | १०% | अ |
| २००६-०७ | १२३९ | २६७.६५ | ४१०.४८ | ७२७.१३ | ३३.०६ | १०% | अ |
| २००७-०८ | १२११ | २९१.२७ | ४०२.५४ | ७३०.९६ | ३८.११ | १०% | अ |
| २००८-०९ | १२४२ | ३१५.०३ | ४६४.०३ | ७८७.२९ | ४२.१५ | १०.५०% | अ |
| २००९-१० | १२०८ | ३४२.२६ | ६१९.१२ | ९१०.१८ | ४६.४६ | १०.५०% | अ |
| २०१०-११ | १२३० | ३६०.७७ | ७४३.९३ | ९६४.६० | ४७.४४ | १०.५०% | अ |
| २०११-१२ | १२४६ | ३८६.५२ | ७४३.५१ | १०५३.५६ | ५०.४९ | १०.५०% | अ |
| २०१२-१३ | १२११ | ४१४.५३ | ८७७.६० | ११४७.४९ | ५०.५२ | १०.५०% | अ |
| २०१३-१४ | १२२५ | ४३३.०० | १०२४.२५ | १२०६.४१ | ४७.६९ | ९.००% | अ |
| २०१४-१५ | १२०२ | ४५९.१३ | १२५८.९८ | १३५९.४३ | ५२.६८ | १०% | अ |
| २०१५-१६ | ११६५ | ४९७.७३ | १४२६.९३ | १४९२.०५ | ५६.६४ | १०% | अ |
| २०१६-१७ | ११४५ | ५३६.५१ | १६६४.८० | १६२९.७३ | ६५.४२ | १०.५०% | अ |
| २०१७-१८ | ११५७ | ५६९.९६ | १७४१.६८ | १८३८.३९ | ७८.७३ | ११.००% | अ |
| २०१८-१९ | १२३६ | ६०९.१६ | १८८३.५० | २०१३.७९ | ८२.०५ | ११.००% | अ |
| २०१९-२० | १२७१ | ६६५.७३ | २१७५.७२ | २३७५.०९ | ८७.३६ | ११.००% | अ |
| २०२०-२१ | १२८९ | ७२२.१७ | २३४१.४० | २५२८.७४ | ८८.४६ | ११.००% | अ |
| २०२१-२२ | १२८८ | ७६९.९४ | २५४२.२५ | २७१५.३७ | ८४.८० | १०.००% | अ |
| २०२२-२३ | १२८५ | ८४१.१७ | २७८०.०५ | ३१३२.०६ | ८८.८० | ०९.००% | अ |
| २०२३-२४ | १२८८ | ९००.७८ | २८९६.६८ | ३३१८.९२ | ९६.९४ | | अ |

| **प्रशांत ननोरे** | **किशोर ढाले** | **पांडुरंग कुकडे** | **अरविंद डिवरे** | **अतुल पोफळी** |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष | व्यवस्थापक |

# श्रध्दांजली

अहवाल वर्षात खालील सभासदांचे दुःखद निधन झाले, मैय्यत सभासदांच्या कुटुंबियांच्या दुःखात कार्यकारी मंडळ व संस्थेचे सभासद सहभागी असून त्यांचे आत्म्यास शांती व सद्‌गती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना।

**स्व.श्री. मनोज हेमराज भाकरे**
**स्व.श्री.लखन जागोजी ढोणे**
**स्व.श्री.रविंद्र श्रीराम वैरागडे**
**स्व.श्री.ईश्वर भैय्यालाल गजरे**
**स्व.श्री.आशिष माणिक जांभूळकर**
**स्व.सौ.निता विशाल ढवळे**
**स्व.श्री.सुधिर दिगांबर पारधी**

**संस्थेचे मय्यत सभासद**

साहित्यिक, राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, कलावंत व खेळाडू तसेच कामगार नेते यांना ही सभा 'श्रध्दांजली' अर्पण करीत आहेत परमेश्वर मृतांचे **आत्म्यास चिरशांती देवो.**

**अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव**
**सर्व संचालक व कर्मचारी वृंद**
नागपूर जिल्हा वीज तांत्रिक कामगार सहकारी पत संस्था
मर्या.नागपूर

नागपूर जिल्हा
वीज तांत्रिक कामगार सहकारी
पत संस्था मर्या.नागपूर

# सभासदांकरिता संस्थेची कार्यालयीन
# माहिती व महत्वाच्या सुचना

• संस्थेची कार्यालयीन वेळ •
**सोमवार ते शुक्रवार**
**सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत**
(मध्यांतर २.३० ते ३.००)

**•शनिवार**
**सकाळी १०.३० ते २.३० वाजेपर्यंत**
(मध्यांतर १२.३० ते १.००)

• पैशाचे देवघेवीचे व्यवहार •
**सोमवार ते शुक्रवार**
**सकाळी १०.३० ते २.०० वाजेपर्यंत**

**• शनिवार**
**सकाळी १०.३० ते १२.०० वाजेपर्यंत**

**मोबाईल नं.: ७८७५६४८८००**

**टिपः वरील वेळापत्रक रविवार व सरकारी सुटीचा दिवस सोडून आहे.**

१. सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात महत्वाचे बदल झाले असून संस्थेला नविन उपविधी लागु झाली आहे. नविन कायद्यानुसार सभासदांना संस्थेच्या कामकाजाची माहिती असणे संस्था ज्या उद्देशपुर्तीसाठी कार्यरत आहे त्या उद्देशपुर्तीकरीता सभासदांचा प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. जे सभासद संस्थेच्या व्यवहारात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग घेणार नाही ते **'अक्रियाशिल सभासद'** म्हणून ओळखले जातील व अशा सभासदांना संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार राहणार नाही.त्यामुळे सभासदांना संस्थेचे सदस्यत्व टिकवून ठेवावयाचे असेल तर संस्थेमध्ये क्रियाशील सभासद म्हणून राहण्याकरीता सहकार कायद्याच्या निकषानुसार त्याची पुर्तता करणे आवश्यक आहे. क्रियाशील सभासदाचे निकष पुढील प्रमाणे आहे.

अ) सभासदाने पाच वर्षातून एकदा 'वार्षिक सर्वसाधारण सभेत' उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

ब) सभासदाने पाच वर्षातून एकदा संस्थेमधून कर्ज घेतले असले पाहिजे. किंवा पाच वर्षातून कोणत्याही एका वर्षात ठेवीच्या रुपाने वार्षिक रु.१०,०००/- (ठेवी व भागभांडवल मिळून) संस्थेमध्ये जमा केले असले पाहिजे.

वरील अटी पुर्ण न करणारे सभासद कायद्याने **'अक्रियाशिल सभासद'** म्हणून ओळखले जातील. अशा सभासदांना आणि थकबाकीदार सभासदांना संस्थेच्या निवडणूकीत प्रत्यक्ष मतदानाचा अधिकार राहणार नाही व भविष्यात त्यांचे सदस्यत्व रद्द होवू शकते. तरी सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की संस्थेत **'क्रियाशिल सभासद'** म्हणून राहण्याकरिता वरील अटीचे पालन करुन संस्थेला सहकार्य करावे.

२. कर्ज मागणी अर्जातील संपूर्ण माहिती व्यवस्थित भरा तसेच अर्जात खोडतोड करु नका

३. आपली बदली झाली तर बदलीच्या ठिकाणचा पोष्टाचा पूर्ण पत्ता संस्थेच्या कार्यालयात त्वरीत कळवा.

४. संस्थेकडे वारसाची नियुक्ती झाली नसल्यास वारस ताबडतोब नियुक्त करा.

५. देवाण घेवाण व्यवहार सुरळीत चालण्याकरीता प्रत्येक सभासदांचा सहीचा नमुना संस्थेत असणे आवश्यक आहे.

६. कर्जफेड करण्याची जबाबदारी कर्जदार व जामीनदार यांची संयुक्तपणे असल्याने आपले व आपण जामीन असलेल्या कर्जदाराच्या कर्जाचे हप्ते वसुल झाले नाही तर जामीनदाराचे पगारातून कपात केले जातात तरी याकडे जातीने लक्ष द्यावे.

७. कर्जदार सभासदाचे सलग तीन हप्ते वसुल झाले नाही तर जामीनदाराचे पगारातून कोणतीही पूर्व सुचना न देता कर्ज वसुली केली जाईल.

८. कोणत्याही सभासदाच्या कपात रकमेचे शेड्युल चेकसह जोपर्यंत वीज कंपनीकडून संस्थेस मिळत नाही तो पर्यंत सभासदांचा हप्ता वसुल झाला असे समजण्यात येणार नाही.

९. अनियमित कर्ज कपात होणाऱ्या सभासदांची जामीनदार म्हणून जमानत स्विकारली जाणार नाही.

१०. कोणत्याही सभासदाने दिलेला जामीनदार हा दोनपेक्षा अधिक सभासदांना जामीन असेल तर तो जामीनदार पात्र समजला जाणार नाही व असा अर्ज नामंजुर करण्यात येईल.

११. कर्जाचा हप्ता न कापल्या गेल्यास तो हप्ता व्याजासहीत रोख संस्थेकडे पोहचविण्याची जबाबदारी सभासदांवर राहील.

१२. दिर्घ मुदती कर्जाचा अर्ज सादर करित असतांना नियमाप्रमाणे पगार पत्रकावर व्यवस्थापक, वीज कंपनी यांची सही असणे अत्यंत आवश्यक आहे.

१३. रुपये ५०,०००/– वर कर्ज अर्ज सादर करतांना रु. १००/– स्टॅम्प पेपर जोडणे आवश्यक आहे.

१४. नविन सभासदांकडून सहा महिने पगारातून भाग व आर.डी. रक्कम नियमित कपात झाल्या शिवाय कर्ज मंजूर करण्यात येणार नाही.

१५ कर्ज घेतल्याशिवाय कर्जाची ५० टक्के परतफेड होईपर्यंत पुन्हा कर्ज मंजुर केल्या जाणार नाही.

१६ या अहवालासोबत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांच्या पालकांनी करावयाचा अर्जाचा नमुना जोडलेला आहे. त्यामधील सुचनेनुसार अर्ज दिलेल्या मुदतीत संस्थेत जमा करावा.

१७. संस्थेच्या कर्ज विषयक नियमांची माहिती करुन घ्या व गरजेनुरुप आवश्यक तेवढेच कर्ज घ्या.

१८. कर्ज मागणी अर्ज वेळेपूर्वी सादर करा व योग्य त्या मुदतीत अर्जातील सर्व बाबींची पूर्तता करा. घाईगडबडीने अपूर्णता राहिल्यास ती कोणाच्याच हिताची नाही.

१९. रु.२०,०००/– चे वर असलेली देय रक्कम क्रॉस चेकने मिळेल तरी आपले खाते बँकेत अवश्य उघडावे.

२०. पत संस्थेमधुन केवळ कर्ज मिळविणे हा उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून नियमितपणे बचतीची सवय लावून घ्या.

२१. कर्ज मंजूर करते वेळी ऋणको सदस्यांचा आणि जमानतदारांच्या सेवेच्या उर्वरीत काळात प्राधान्यांनी विचार करण्यांत येईल. ह्या करीता अर्जदारांने आणि जमानतदाराने सेवानिवृत्त बदलचा कार्यालयीन दाखला देणे अनिवार्य आहे.

२२. चुकीची माहिती दिल्यास किंवा सत्य परिस्थिती लपविण्याचा प्रयत्न केल्यास कर्जाची रक्कम ऋणको सभासदांकडून कोणत्याही वेळी परत मागण्याचा संस्थेला अधिकार आहे. योग्य कार्यवाही नंतर अशा सभासदांचे सदस्यत्व रद्द करुन त्यांचे भाग भांडवल आणि इतर जमा राशी जप्त करण्याचा अधिकार संस्थेला राहिल.

२३. मुदती ठेवी कमीत कमी ३ वर्ष वर्षाचे वर ७.५०% टक्के दराने स्विकारल्या जातील. सेवानिवृत्त सभासदांकडुन ८.००% दराने ठेवी स्विकारल्या जातील.

२४. मुदत ठेव २५=०० लाख रु. व त्यावरील एकमुस्त रकमेवर ८.५०% दराने स्विकारल्या जाईल. त्याची मुदत तीन वर्ष राहील व त्यावर दरमहा व्याज दिल्या जाईल. मुदतीचे आंत रक्कम परत मागील त्या ठेवीवर प्रचलीत व्याज दरापेक्षा २% कमी दिल्या जाईल.

२५. मुदतीचे आत परंतु तीन महिने कमी नाही अशा ठेवी परत मागीतल्यास त्या ठेवीवर प्रचलित दरापेक्षा २ टक्के व्याज कमी दिले जाईल. परंतु त्यामध्ये समितीचा निर्णय अंतीम राहील.

२६. मुदत ठेव तीन वर्षाचे वर कालावधी करीता आणि रक्कम रु.१०,०००/– चे वर असल्यास दरमहा व्याज देण्यात येईल.

२७. मुदतीच्या आंत आवर्त ठेव बंद करावयाची असल्यास त्या जमा रकमेवर वर्षाच्या पटीत प्रचलीत व्याज दरापेक्षा २ टक्के कमी व्याज दराने व्याज दिल्या जाईल.

२८. आकस्मिक कर्ज घेतांना चालु महिन्याची पगारस्लीप सादर करणे आवश्यक आहे.

२९. प्रत्येक सभासदांची के.वाय.सी.(KYC) असणे आवश्यक त्याकरिता के.वाय.सी.(KYC) फॉर्म, आधार कार्ड, पॅनकार्ड, इलेक्ट्रीकबिल, १ कोरा चेक (कॅन्सल केलेला) संस्थेत प्रत्यक्ष येवून सादर करणे.

# ३६ वा वार्षिक अहवाल
## (दिनांक ३१.३.२०२४ अखेर संपलेल्या वर्षाचा)

**सन्मानिय**

**भागधारक, सहकारी बंधु भगिनींनो,**

संचालक मंडळावर आपण सर्वांनी विश्वासपुर्वक जबाबदारी टाकुन वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल तसेच आपण सर्वजण येथे उपस्थित झालात याकरिता मी सर्वप्रथम आपले आभार मानुन सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. सर्वप्रथम मी आपल्या संस्थेच्या निधन पावलेल्या सभासदांना त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून **श्रध्दाजंली** अर्पण करतो.संचालक मंडळाच्या वतीने ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल व सन २०२३-२४ ह्या सहकार वर्षात संस्थेत केलेल्या कामकाजाची माहिती आपणासमोर सादर करतांना आनंद होत आहे. **''धरु या सहकाराची कास करु सर्वांचा विकास''** ह्या उक्तीची पूर्तता करण्याच्या हेतुने मागील पस्तीस वर्षात संचालक मंडळाने सर्व अडचणीवर मात केली व संस्था सशक्त पायावर उभी करुन प्रगतीपथावर अग्रेसीत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. आज त्याचे चित्र अहवाल रुपाने आपणासमोर सादर करतांना मला अभिमान वाटतो. करीता या वर्षाचा एकत्रित अहवाल सादर करीत आहोत.

**१. संचालक मंडळाच्या सभा-** या अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १४ सभा संपन्न झाल्यात. ह्या सभामध्ये संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आलेत.

**२.सभासद संख्या-** या अहवाल वर्षात नविन ५० सभासद दाखल करुन घेण्यात आले आहेत. दि. ३१.३.२०२४ अखेर एकुण सभासद संख्या १२८८ आहे.

**३.भागभांडवल-** अहवाल वर्षात रु. १,००,४६,०००=०० नी भागभांडवलात वाढ झाली असून रु. ४०,८४,२००=०० भाग रक्कम परत करण्यात आली आहे. दि.३१.३.२०२४ अखेर एकत्रित भाग भांडवल रु. ९,००,७८,८७०=०० संस्थेत जमा आहेत.

**४.राखीव निधी-** अहवाल वर्षात राखीव निधीमध्ये नफा विनियोजन पत्रकानुसार रु.२२,२०,१११=०० नी या वर्षात प्राप्त प्रवेश फी रु.५००/- नी वाढ झालेली आहे व अशोध्य लाभांष रु. ४९,४५७=०० घेता दि.३१.३.२०२४ अखेर राखीव निधी ३,३७,६०,३२०=५२ संस्थेत जमा आहेत.

**५.इमारत निधी-** अहवाल वर्षात रु. १७,४००=०० सभासदांकडून इमारत निधी प्राप्त झाली असून मागील नफा विनियोजन पत्रकानुसार रु १०,०००=०० असे एकुण रु. २७,४००=०० ची इमारत निधी मध्ये वाढ झाली आहे. दि. ३१.३.२०२४ अखेर एकुण इमारत निधी २५,६१,१८०=८६ जमा आहे.

**६.कल्याण निधी–**

**अ) शिक्षण फंड–** सभासदांच्या मुलांपैकी गुणानुक्रमे पास झालेल्या पाल्यांना प्रोत्साहन म्हणून बक्षिस वाटप करण्याकरिता सदर्हू फंड असून संचालक मंडळाने या फंडाचा योग्य वापर या वर्षात केला आहे. या वर्षात ४१९ गुणवत्ता प्राप्त पाल्यांना प्रोत्साहनपर म्हणून बक्षिस वितरण समारंभ **श्रीमान रवि बारई, केंद्रीय अध्यक्ष,** विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन यांचे हस्ते करण्यात आला.

**ब) मय्यत फंड–** सभासदांचे अपघाती अथवा नैसर्गिक निधन झाल्यास सभासदांच्या आपत्तीग्रस्त अवलंबितांना मदत म्हणून हा फंड आहे. आपतग्रस्तांना म्हणुन रु.२०,००१=०० देण्यात येते.

**क) कल्याण निधी मदत–** पाल्यांना बक्षिस अवलंबितांना मदत व सेवानिवृत्त सभासदांचा सहपत्नीक सत्कार करिता या निधीव्दारे खर्च करण्यात आला

**७.ठेवी–** संस्था स्वबळावर चालविण्याकरीता संस्थेत ठेवीचे प्रमाण जास्त असणे आवश्यक आहे. त्यानुसार संस्था सभासदाकडून आकर्षक व्याज दरात मुदत ठेव व आवर्ती ठेव स्विकारते याकरीता सभासदांचे सहकार्य मोलाचे आहे.

**गुतंवा पैसा सोसायटीत।**
**उपयोगी पडेल अडचणीत।।**

या उक्तीची कास धरुन सदस्यांनी आपल्याच संस्थेत 'मुदत ठेवी' व 'आवर्ती ठेवी' अंतर्गत पैसा गुंतवून संस्था आत्मनिर्भर होण्यास हातभार लावावा तसेच ''**आजची अल्पबचत उद्याचा आधार**'' हा विचार करुन स्वतःस आत्मनिर्भर करावे ही विनंती. अहवाल वर्षात रु. १३,८३,०३,७५०=०० मुदत ठेव प्राप्त झाली असून रु. १३,०६,४७,७६८=०० मुदत ठेव परत केली आहे. दि.३१.३.२०२४ अखेर मुदत ठेव रु. २५,१६,९९,११७=०० संस्थेत जमा आहे.

अहवाल वर्षात रु.१,२६,५८,६६०=०० आवर्त ठेव प्राप्त झाली असून रु. १,००,९२,८९०=०० आवर्त ठेव परत करण्यात आली आहे. दि. ३१.३.२०२४ अखेर आवर्त ठेव रु. १,९६,२५,६७१ = ०० संस्थेत जमा आहे.

**निवृत्ती ठेव**: आपण सभासदांचे पगारातून दरमहा रु.२००/–निवृत्ती ठेव म्हणून कपात करतो.ही ठेव सभासद निवृत्त झाल्यावर त्यास चक्रवाढ व्याज दराने परत करतो. अहवाल वर्षात रु. २७,८७,५२०=०० निवृत्ती ठेव जमा झाली असून रु.१३,२२,६२०=०० निवृत्ती ठेव परत करण्यात आली दि.३१.३.२०२४ अखेर रु.१,८२,३८,२२०=०० निवृत्ती ठेव संस्थेत जमा आहे.

**८. सामुहिक गट विमा योजना–** संस्था आपल्या सभासदांसाठी गट विमा योजना राबवित आहे ती खालील प्रमाणे १) संस्थेचा सभासद ज्याने मासिक **२००/–** संस्थेत जमा केले पाहिजे. असा सभासद या योजनेत सहभागी होऊ शकेल.

२) या योजने अंतर्गत सभासदांचा मृत्यु झाल्यास त्याचे वारसदाराला रु. २,५०,०००=०० देण्यात येईल.

३) सभासदाकडे कर्ज बाकी असल्यास इतर संस्थेला घेणे असलेल्या रक्कमा वारसदाराला मिळणाऱ्या रकमेतुन कपात करण्यात येईल. या योजनेत बदल करण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीला राहिल.

४) संस्थेचा सभासद वीज कंपनीतून सेवानिवृत्त /स्वेच्छा निवृत्ती झालेल्या तारखेनंतर त्यांचे सभासदत्व काही कारणाने रद्द न झाल्यास (उदा. कर्जबाकी असेल, जामीनदार देणे घेणे) व त्या काळात सभासदांच्या मृत्यु झाल्यास अशा सभासदांना विमा योजनेचा लाभ मिळणार नाही.

५) सभासदाकडून आलेल्या विमा हप्त्याची रक्कम परत मिळणार नाही.

६) पहिल्या विमा हप्त्याची रक्कम जो पर्यंत संस्थेत जमा होणार नाही तो पर्यंत सभासद विमा योजनेचा लाभ होण्यास पात्र असणार नाही.

**९. सभासदांना कर्ज वाटप–** संस्था सभासदांना रु. **२०,००,०००=००** पर्यंत कर्ज वाटप करीत आहे. अहवाल वर्षात नियमित कर्ज रु. १०,४६,८५,९३०=०० आकस्मित कर्ज रु.२,१९,२३,४५०=००, वस्तुरुप कर्ज २६,५६,१८०=०० वाटप केलेले आहे. दि. ३१.३.२०२४ अखेर एकत्रित सर्व मिळून कर्ज येणे बाकी रु. ३३,१८,९२,००९=०० ऐवढी येणे बाकी आहे.

**१०. गुंतवणूक–** संस्थेचा आर्थिक मेळ व मुदती ठेव सुरक्षा यासाठी संस्थेनी बरीच गुंतवणूक केली आहे. दि.३१.३.२०२४ अखेर राखीव निधी रु.३,५७,५८,०९५=२० बँक शेअर्स जिल्हा मध्यवर्ती बँक रु.७५,०००=०० व कर्मचारी पत संस्था संघाचे शेअर्स रु. ५००/– व ग्रॅज्युएटी फंड गुंतवणुक रु. ३६,७४,६२१=१० मुदती ठेव एकुण ७,४१,५६,२६७=०० अशी एकुण गुंतवणुक रु. ११,३६,६४,४८३=३० ची करुन संस्थेची आर्थिक बाजु बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**११. निव्वळ नफा आणि लाभांश–** अहवाल वर्षात म्हणजेज २०२३–२४ या वर्षात संस्थेला रु.९६,९४,७८६=७९ एवढा निव्वळ नफा प्राप्त झाला आहे. संचालक मंडळानी **९.०० % लाभांश** वाटपाची शिफारस केली आहे. तरी मंजुरी प्रदान करण्यात यावी.

**१२. पुढील वाटचाल–**

१) संस्था स्वबळावर चालविण्याचे दृष्टीने मुदती ठेव व आवर्ती ठेव या योजनांचा प्रभावी प्रचार करणे.

२) मागेल त्याला कर्ज पुरवठा संस्थेच्या नियमानुसार करण्याचा आटोकाट प्रयत्न.

३) बचत व स्वाबलंबन याचा सतत पाठपुरावा.

४) सभासद व त्यांच्या अवलंबीतासाठी कल्याण योजना समाधानकारकपणे राबविणे.

५) संस्थेचा कारभार काटकसरीने करुन चोख व्यवस्था ठेवणे.

६) स्वार्थास मुरड, सामुहिक जागृतता, सयंमी वर्तन ही सहकाराची त्रिसुत्री लक्षात ठेवून सुयोग्य व सुजान कार्यालयीन कामगारांसह प्रगतीचा आटोकाट प्रयत्न.

**१३ समारोप व आभार प्रदर्शन–** महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीचे संबंधीत अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी यांनी या वर्षात पूर्ण सहयोग केल्यामुळे संस्था प्रगतीपथ गाठत आहे तसेच संस्थेजवळ विश्वासाने मुदती ठेव ठेवणाऱ्या ठेवीदारांचे हार्दिक आभार.

संस्थेचा आत्मा म्हणजे भागधारक सभासद होय. त्यासर्वांचे मनःपुर्वक आभार मानतो तसेच त्यांचा विश्वास व एकजुट यामुळेच आजचा हा आनंदाचा दिवस साजरा होत आहे त्यात मोलाचा वाटा **मा.श्री.रणजीतबाबु देशमुख**, माजी सरचिटणीस, वि.क्षे.तां.का.युनियन, **मा.श्री. रवी बारई,** विद्यमान केंद्रीय अध्यक्ष, वि.क्षे.तां.का.यु., तसेच वि.क्षे.तां. कामगार युनियनचे केंद्रीय पदाधिकारी परीमंडळ, प्रविभाग आणि उपविभागीय आजी माजी पदाधिकारी व सभासद यांचे सुध्दा आभार मानतो.

तसेच संस्थेच वैधानिक अंकेक्षक **मे. एस.एस.आर.पी.एन.आणि कंपनी श्री.नरेशजी जाखोटीया** यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनासाठी त्यांचे आभारी आहे.

**मा.श्री. प्रविण वानखेडे** विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर तसेच इतर पदाधिकारी व कर्मचारी ह्यांनी संस्थेस दिलेल्या मौलीक सहकार्याबद्दल ही कार्यकारणी आभारी आहे. तसेच ना.जि.मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक, प्रबंधक , मुख्य अधिकारी त्याप्रमाणे महाल शाखेचे व्यवस्थापक साहेब यांचे सुध्दा ही कार्यकारिणी आभारी आहे.

आपले स्नेहांकित

**धन्यवाद!**

**(पांडुरंग कुकडे)**
**सचिव**
नागपूर जिल्हा वीज तांत्रिक कामगार सहकारी
पत संस्था, मर्या.नागपूर
र.नं.१०५

**जय सहकार! जयहिंद! जय तांत्रिक!!!**

M/s. SSRPN & Co.
Chartered Accountant
10, Laxmi Vyankatesh Apartment, Telephone Exchange Square, Central Avenue Road, Nagpur - 440 008
Mob.: 8087749611 / 7972617745
E-mail : cassrpn@gmail.com Website : www.ssrpn.com

# लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या कायदा कलम ८१ (५-३) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या नियम ६९(३) अन्वये द्यावयावा)

मी नागपूर जिल्हा वीज तांत्रिक कामगार सहकारी पत संस्था, मर्यादित नागपूर जिल्हा-नागपूर र.न. एनजीपी/ओ/१०५/१९८८-८९या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च २०२४ दिनांकाचा ताळेबंद व सन २०२३-२४ या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक तपासले आहे. या आर्थिक पत्रकांचे संपूर्ण जवाबदारी संस्थेच्या व्यवस्थापक मंडळानी आहे. माझी जवाबदारी त्या आर्थिक पत्रकावर माझ्या लेखापरिक्षणाचे आधारे माझे मत प्रकट करणे ऐवढेच आहे.

मी अंकेक्षण हे भारतामध्ये प्रचलीत असलेल्या मानक अनुसार केले. त्या अंकेक्षण मानक अनुसार अंकेक्षण करतांना अंकेक्षकाने योजनाबध्दतेने अंकेक्षण करून आर्थिक पत्रकामध्ये गंभीर दोष व चूका नाहीत या बद्दल आवश्यक विश्वासहर्ता संपादित करणे आवश्यक आहे. अंकेक्षकाने आर्थिक पत्रकामध्ये दिलेली माहीती ही योग्य रित्या दर्शविली आहे हयानी नमुना पध्दतीने पडताळनी करण्यात येते व संबंधीत रकमेने पुराने पडताळण्यात येतात. अंकेक्षणमध्ये संचालकांनी अवलंबलेल्या लेखांकन मानक व प्रमुख अंदाज यांचे सर्वेक्षण करण्यात येते व त्यांचे आर्थिक पत्रकात दिलेल्या माहितीशी सुसंबंधता तपासण्यात येते. माझ्या विश्वासानुसार माझे अंकेक्षण हे लेखापरीक्षणावरील मताकरिता यथोचित आहे.

वर नमुद केलेल्या व विभाग अ ब व क मधील शेरासहित मी अडवल सादर करतो की:-

१. ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केलेल्याप्रमाणे अधिनियमानुसार तयार करण्यात आले आहे.

२. मला माझ्या माहितीप्रमाणे व संमजुतीप्रमाणे माझ्या लेखा परिक्षणाच्या कारणसाठी आवश्यक असणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे प्राप्त झालेली आहे

३. या पुस्तकांचा लेखापरिक्षणानंतर माझ्या मतानुसार महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व संस्थेचे पोट नियम या अन्वये आवश्यक असलेले हिशोबाचे योग्य ती पुस्तके संस्थेनी ठेवलेली आहे.

४. लेखा परिक्षण केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या पुस्तकांशी जुळते.

५. माझ्या मते अहवालात नमुद केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक सोबत जोडलेल्या परिशिष्ट्य मधील त्रुटी वगळता दि इंस्टीट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडिया यांनी जाहिर केलेल्या अंकेक्षण मानक अन्वये आहेत.

वरील दिल्याप्रमाणे आणि माझ्यामते व माझ्या माहितीनुसार व मला मिळालेल्या माहिती व खुलासाने आधारे संस्थेचे हिशोब, अधिनियमानुसार आवश्यक अशी सर्व माहिती देतात व त्यातुन खालील बाबतीत वास्तवीक व खरे चित्र दिसून येते.

१. जमा खर्चाच्या ताळेबंदाच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२४ या तारखेपर्यंत संस्थेच्या कारभाराची स्थिती.

२. नफा तोटा पत्रकाच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२४ रोजी संपणा-या आर्थिक वर्षातील नफा बाबत.

३. सन २०२३-२०२४ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखा परिक्षण "वर्ग अ" देण्यात आला आहे.

नागपूर
दिनांक :- १३.०६.२०२४
UDIN NO. 24102588BKELFJ1319

तर्फे मे. एस.एस.आर.पी.एन. अँन्ड कंपनी
सनदी लेखापाल

M/S. SSRPN & CO. FRN 118245W CHARTERED ACCOUNTANTS

सी.ए. नरेश जखोटिया
पार्टनर
एम. नं. १०२५८८
फर्म रजि. नं. ११८२४५डब्ल्यु

# नफा तोटा पत्रक (काटोल शाखा)

## दिनांक: ३१.३.२०२४ अखेर

| सन २०२२-२३ चे आकडे | खर्च विवरण | सन २०२३-२४ चे आकडे | सन २०२२-२३ चे आकडे | उत्पन्न विवरण | सन २०२३-२४ चे आकडे |
|---|---|---|---|---|---|
| १६,२४,२१७=०० | १.मुदत ठेव देणे व्याज तरतूद | १७,२५,५२८=०० | ४५,५९,१४३=०० | १.नियमित कर्जावरील व्याज प्राप्त | ४७,४५,४७९=०० |
| १,२०,०००=०० | २.आर्त ठेव देणे व्याज तरतूद | २,५४,६९०=०० | ९२,१७७=०० | २.आकस्मिक कर्ज वरील व्याज प्राप्त | १,२२,९५८=०० |
| ८०,०३६=०० | ३. निवृत्ती ठेव देणे व्याज तरतूद | १,९२,८१६=०० | १४,८८७=०० | ३.मुदत ठेव कर्जावरील व्याज | ६८,९९१=०० |
| ३,३२०=०० | ४. किरकोळ खर्च | ३१,६४५=०० | ४८,७९९=०० | ४.व्याज प्राप्त वस्तुरुप कर्ज | ४६,२५०=०० |
| ८,२४=२० | ५. बँक कमिशन व ड्राफ्ट खर्च | ७०८=०० | ३०,५३३=३९ | ५.व्याज प्राप्त सेविंग बँक खाते | २७,८७८=४९ |
| ७९,२००=०० | ६. कार्यालय भाडे | ७९,२००=०० | | | |
| ११,४०७=०० | ७. कार्यालयीन खर्च | ४२,५११=०० | २३०=०० | ६. फॉर्म विक्री | ३१०=०० |
| १,१००=०० | ८. मजुरी खर्च | ६,०००=०० | ५=०० | ७. सभासद फॉर्म विक्री | ६०=०० |
| १,४८५=०० | ९. प्रवास खर्च, सं. संचालक | ४,०००=०० | २,१३,०६०=०० | ८. व्यवस्थापन खर्च जमा | १,९६,१९०=०० |
| ००००= ०० | १०. सत्कार खर्च | १४,९३९=०० | | | |
| ११६=०० | ११.झेराक्स खर्च | ८०=०० | | | |
| ३,७२०=०० | १२. पाणी बिल | ०००=०० | | | |
| १९,७७०=०० | १३. इलेक्ट्रीक बिल खर्च | ४,७००=०० | | | |
| ००००= ०० | १४. पोस्टेज खर्च | ५३=१० | | | |
| ००००= ०० | १५. स्टेशनरी खर्च | १,०८८=०० | | | |
| ००००= ०० | १६.जाहिरात खर्च | १०,०००=०० | | | |
| **३०,१३,६३९=१९** | **१७. निव्वळ नफा** | **२८,४०,१५८=३९** | | | |
| **४९,५८,८३४=३९** | | **५२,०८,११६=४९** | **४९,५८,८३४=३९** | **एकुण** | **५२,०८,११६=४९** |

| **प्रशांत ननोरे** | **किशोर ढाले** | **पांडुरंग कुकडे** | **अरविंद डिवरे** | **अतुल पोफळी** |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष | व्यवस्थापक |

नागपूर जिल्हा
**वीज तांत्रिक कामगार सहकारी**
पत संस्था मर्या.नागपूर

# ताळेबंद पत्रक (काटोल शाखा)

## दिनांक: ३१.३.२०२४ अखेर

| सन २०२२-२३ चे आकडे रु. पै. | देयता वितरण | सन २०२३-२४ चे आकडे रु. पै. | सन २०२२-२३ चे आकडे रु. पै. | संपत्ती वितरण | सन २०२३-२४ चे आकडे रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १,४५,५९,०५०=०० | भाग भांडवल | १,५०,८९,३५०=०० | ११७=५५ | रोख रक्कम शिल्लक | १४५=४५ |
| ४,२००=०० | इमारत निधी | ५,४००=०० | १०,२००=७० | बँक चालु खाते | ८३८४=५० |
| ४,२३,१०१=०० | सभासद कल्याण निधी | ४,६३,२८५=०० | | (शिक्षक सहकारी बूंक काटोल) | |
| २०,१३,८२०=०० | निवृत्ती ठेव | २२,३०,२००=०० | १,७६,८१९=६० | अरविंद सहकारी बँक काटोल | १,१४,२६४=८० |
| ६,९८,३९०=०० | आवर्त ठेव | ९,३७,२९०=०० | ५,२५,२६५=५७ | बँक ऑफ इंडिया काटोल | २,७०,०१४=०६ |
| २,१२,५०,०५०=०० | मुदत ठेव | १,९७,७१,०००=०० | ५,१०,९१,६००=०० | नियमित कर्ज (सभासद) | ४,९९,३५,६००=०० |
| ९४,१६,२४०=६३ | मुख्यालय खाते | ८६,९०,१९८=८२ | ११,५२,५७०=०० | आकस्मिक कर्ज (सभासद) | १२,९८,२७०=०० |
| ४२,६२५=६० | पॉलीसी असाईमेंट खर्च | ४८,९३८=६० | ७,४३,०९०=०० | वस्तुरुप कर्ज (सभासद) | ११,१३,०४०=०० |
